प्रति,                                                                                    दि. १४. १२ .२०१५

**श्री अतुल साळुंके,**
राज्य समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना,
महाराष्ट्र राज्य.

विषय: राज्यस्तरीय श्रमर्षी बाबा आमटे राष्ट्रीय एकात्मता युवा शिबीर,
किनवट यासाठी विद्यार्थी पाठवणे बाबत...

महोदय,

वरील विषयी आपणाशी फोनवर चर्चा झाली आहे, त्यानुसार आपणास कळविण्यात येते की भारत जोडो युवा अकादमी तर्फे २०१४-१५ मध्ये राज्यस्तरीय श्रमर्षी बाबा आमटे राष्ट्रीय एकात्मता युवा शिबीर किनवट येथे घेण्यात आले होते. त्यास राज्यातील सर्व विद्यापीठातून ३५० विद्यार्थी सहभागी झाले होते आणि या शिबिरास खूप उत्तम प्रतिसाद आणि प्रतिक्रिया मिळालेल्या आहेत.

याही वर्षीभारत जोडो युवा अकादमी तर्फे २१ ते २५ डिसेंबर २०१५ दरम्यान राज्यस्तरीय श्रमर्षी बाबा आमटे राष्ट्रीय एकात्मता युवा शिबीर किनवट, जिल्हा नांदेड येथे आयोजित करण्यात आले आहे. सर्व विद्यापीठांना आमच्या तर्फे पत्र पाठविण्यात आली आहेत.

यावर्षी पडलेला दुष्काळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, वाढती असहिष्णुता इत्यादी विषयांवर वैचारिक मांडणी, श्रमदान, अनुभव कथन, जंगल भ्रमण इत्यादी विविध उपक्रमांचे या शिबिरात आयोजन करण्यात आले आहे. यासाठी विविध मान्यवरांचे मार्गदर्शन होणार असून ज्येष्ठ गांधीवादी मा.एस. एन. सुब्बाराव यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. तरी महाराष्ट्रातील अकृषीविद्यापीठातून प्रत्येकी किमान २५ आणि मराठवाड्यातील दोन विद्यापीठातून किमान ५० विद्यार्थी पाठविणे बाबत आपण सर्व विद्यापीठांना कळवून सहकार्य करावे, ही विनंती.

सोबत:                                                                                    आपली विश्वासू
कार्यक्रम पत्रिका

**प्राचार्य सविता शेटे**
उपाध्यक्ष, भारत जोडो युवा अकादमी
तथा
प्राचार्य, महिला कला महाविद्यालय, बीड